# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे-३७

जा.क्र. : प्रशा/व्य.मं./२०१६/ ०९/०७/२०१६

## कार्यवृत्तांत

विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची तातडीची सभा गुरूवार दि. ७ जुलै २०१६ रोजी दुपारी ३.३० वाजता विद्यापीठ भवन, गुलटेकडी, पुणे-३७ येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी खालील सदस्य उपस्थित होते:-

१. डॉ. दिपक ज. टिळक, कुलगुरू (अध्यक्ष)
२. डॉ. मा. चिं. दिक्षित, मा. कुलपती नामनिर्देशित शैक्षणिक तज्ज्ञ
३. डॉ. हेमंत के. अभ्यंकर, मा. कुलपती नामनिर्देशित शैक्षणिक तज्ज्ञ
४. डॉ. श्री. ग. बापट, मा. कुलपती नामनिर्देशित शैक्षणिक तज्ज्ञ
५. डॉ. श्रीपाद भट, प्राध्यापक प्रतिनिधी
६. डॉ. माधवी रेणावीकर, सहयोगी प्राध्यापक प्रतिनिधी
७. श्रीमती सरिता साठे, विश्वस्त मंडळ प्रतिनिधी
८. सौ. प्रणति टिळक, विश्वस्त मंडळ प्रतिनिधी
९. डॉ. अभिजीत जोशी, प्रभारी कुलसचिव (सचिव)

डॉ. स.प्र.सरदेशमुख, डॉ. गीताली हृषिकेश मोने-टिळक, मा. शिक्षक सहसंचालक, उच्चशिक्षण अनुदान, पुणे हे सभेस उपस्थित राहू शकले नाहीत.

१) व्यवस्थापन मंडळाची मागील सभा दि. १० जून २०१६ रोजी झाली. त्या सभेचा कार्यवृत्तांत संमत करणे व केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे. (कार्यवृत्तांत प्रत जा. क्र.प्रशा/व्य.मं./२०१६/७८१ दि. १४ जून २०१६ अन्वये पाठविली आहे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सोबत जोडला आहे.)

**ठराव : व्य.मं.२०१६-१४३**

कार्यवृत्तांत संमत करण्यात येत असून केलेल्या कार्यवाहीची नोंद घेतली.

२) संस्कृत पारंगत मधील वैकल्पिक विषय घेऊन पी.जी. डिप्लोमा सुरू करण्याबाबत विचार.
(यंदाच्या वर्षी न्याय हा वैकल्पिक विषय घेऊन पदव्युत्तर पदविका करण्यासाठी खूप चौकशी होत आहे. त्यासाठी विभागप्रमुखांनी यास संदर्भात विनंती अर्ज सादर केला आहे)

**ठराव : व्य.मं.२०१६-१४४**

विनंती अर्जास मान्यता देण्यात आली.

३) विद्यापीठातील BBA-HT या अभ्यासक्रमास विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढवून देण्याबाबत विचार.
(यंदाच्या वर्षी वरील अभ्यासक्रमास सध्याच्या प्रवेश क्षमते पेक्षा अधिक प्रवेश होतील असे दिसत आहे. त्यासाठी प्राचार्यांनी यासंदर्भात विनंती अर्ज दाखल केला आहे)

**ठराव : व्य.मं.२०१६-१४५**

सध्याची ६० असलेली विद्यार्थी क्षमता २० ने वाढवून ८० करण्यास मान्यता देण्यात आली.

४) आयुर्वेद विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या M.Sc. आहारशास्त्र या अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता १० वरून २० करण्याबाबत विचार.
(सदर विषयासाठी या शैक्षणिक वर्षामधे सहायक्क प्राध्यापक यांची नियुक्ती करण्यात आली आहे).

**ठराव : व्य.मं.२०१६-१४६**
सध्याची १० असलेली विद्यार्थी क्षमता वाढवून २० करण्यास मान्यता देण्यात आली.

५) B.PT. अभ्यासक्रमासाठी प्रवेशक्षमता वाढविण्यासाठी राज्यशासनाकडे पाठपुरावा करणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१४७**
शैक्षणिक वर्ष २०१७-१८ सुरू होण्यापूर्वी प्रवेशक्षमता वाढवणे संबंधात राज्य शासन व असोसिएशन कडे फिजीओथेरपी विभागातर्फे पाठपुरावा करण्यात यावा.

६) तत्वज्ञान या विषयात विद्यावाचस्पति हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून परत सुरू करण्याबाबत विचार.
(ज्ञानदिप विद्यापीठ, पुणे चे अधिष्ठाता यांनी यासंदर्भात विनंती अर्ज दाखल केला आहे)

**ठराव : व्य.मं.२०१६-१४८**
शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठीच्या प्रवेश परिक्षा दि २६ जून २०१६ रोजी पार पडली असून वरील विषयाचा विचार डिसेंबर २०१६ मधे करण्यात यावा.

७) बी.एड. पदवी अभ्यासक्रम (२०१४) मधील अनुषेश विषयांची परिक्षा देण्यासाठी अर्ज करण्यास परवानगी देणेबाबत.
(वरील अभ्यासक्रमाच्या अनुषेश विषयांची परिक्षा देण्यासाठी विद्यार्थीनी श्रीमती ऋतिका शिवणकर हिने विनंती अर्ज दाखल केला आहे)

**ठराव : व्य.मं.२०१६-१४९**
वरील अभ्यासक्रमाच्या अनुषेश विषयांची परिक्षा देण्यासाठी विद्यार्थीनी श्रीमती ऋतिका शिवणकर हिने दाखाल केलेल्या विनंती अर्जास मान्यता देण्यात आली.

८) विश्वविद्यालय अनुदान आयोग यांचे दि. १९.०५.२०१६ चे पत्र क्र. D.O.No.F.1-1/2016(Secy) यावर विचार करणेबाबत.
(विश्वविद्यालय अनुदान आयोगाने वरील पत्राद्वारे उत्तीर्ण विद्यार्थ्यांना १८० दिवसांपर्यंत पदवी देण्यात यावी अशी सूचना केली आहे)

**ठराव : व्य.मं.२०१६-१५०**
वार्षिक पदवीदान समारंभ नोव्हेंबर / डिसेंबर महिन्यामधे आयोजित करावा. जे विद्यार्थी नोव्हेंबर/डिसेंबर मधे उत्तीर्ण होतील त्यांच्यासाठी जून महिन्यात छोटेखानी समारंभाचे आयोजन करून पदवी प्रदान करण्यात यावी.

९) शासनमान्य शिक्षक व शिक्षकेतर रिक्त पदे भरणेबाबत.
(विद्यापीठामधे सध्या शासनमान्य शिक्षकांची १० पदे रिक्त असून शिक्षकेतर ८ पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र राज्य शासनाच्या धोरणानुसार रिक्त शिक्षकीय पदांच्या ५०% इतकी पदे भरण्यास परवानगी देण्यात येते. त्यानुसार आपणास ५ पदे भरण्याची अनुमती मिळू शकते. विभागांची एकूण गरज लक्षात घेता ५ पदे ही खालीलप्रमाणे भरण्यास प्रस्ताव सादर करण्यास मान्यता मिळणेबाबत.

**अधिव्याख्याता : रिक्त पदे ४ पैकी २ पदे भरण्यास अनुमती.**

अ) History : १ पद, O.B.C. वर्गासाठी राखीव
ब) राज्य शासन निर्णय क्र. टि.म.वि १९९०/१९७२/वि.शी१ नुसार १ अधिव्याख्याता या निर्णयानुसार अधिव्याख्याता (सहाय्यक प्राध्यापक) हे खुल्या वर्गातील पद आयुर्वेद विभागाकरीता निश्चित करणेबाबत अनुमती.

**प्र-पाठक (सहप्राध्यापक) : रिक्त पदे ४ पैकी २ पदे भरण्यास अनुमती.**

अ) Sociology : खुला वर्ग १ पद
ब) संस्कृत : खुला वर्ग १ पद

**प्राध्यापक : : रिक्त पदे २ पैकी १ पद भरण्यास अनुमती.**

अ) अर्थशास्त्र : खुला वर्ग १ पद

राज्यशासन निर्णयानुसार सध्या एकूण पदांच्या केवळ ४% शिक्षकेतर पदे भरण्यास अनुमती देण्यात येते. त्यानुसार आपणास २ पदे भरता येतील. त्यामुळे प्राधान्याने मुख्य लेखापाल – खुला वर्ग १ पद व सहाय्यक कुलसचिव – खुला वर्ग १ पद ही २ पदे भरण्यासाठी मान्यता.

ठराव : व्य.मं.२०१६-१५१
वरील शिक्षकीय व शिक्षकेतर पदे भरण्यास मंजूरी देण्यात आली. प्रशासन विभागाने संचालक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, पुणे, यांच्याकडे या विषयी पाठपुरावा करावा.

१०) विद्यापीठाच्या Ethics Committee ची मुदत १४ मार्च २०१६ रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यात खालील बदल करून नव्याने Ethics Committee साठी मान्यता देण्यात येण्याबाबत. सदर समितीचा कार्यकाल १५ मार्च २०१६ ते १४ मार्च २०१९ असा राहील.

| Sr.No. | Designation in Ethics Committee | Name of the old member | Name of the new member |
|---|---|---|---|
| 1 | Chairperson | Dr. Mujumdar A.M. | Dr. Mujumdar A.M. |
| 2 | Member Secretary | Dr. Joshi A.H. | Dr. Joshi A.H. |
| 3 | Basic Medical Scientist | Dr. Sathey S.M. | **Dr. A.B. Dharmadhikari** |
| 4 | Clinician | Dr. Damle B.S. | Dr. Damle B.S. |
| 5 | Educated person from community | Dr. Deshmukh Vinita | Dr. Deshmukh Vinita |
| 6 | Legal Expert | Advt. Kulkarni Aniruddha | Advt. Kulkarni Aniruddha |
| 7 | Representative of Non- Governmental Voluntary Agency | Mr. Yadav Prakash | **Mrs. Geeta Joshi** |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | Lay Man Representative | Mr. Joshi Narendra | **Mr. Kelkar Rishikesh** |
| 9 | Research Expert | Dr. Yogini Kulkarni | **Dr. Supriya Bhalerao** |

ठराव : व्य.मं.२०१६-१५२

नव्याने गठीत केलेल्या समितीस मान्यता देण्यात आली. यासंदर्भातील पुढील कार्यवाही आयुर्वेद विभागाकडून करण्यात यावी.

सही/- डॉ. अभिजीत जोशी
प्रभारी कुलसचिव

सही/- डॉ. दीपक ज. टिळक
अध्यक्ष